# श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी

# महिला विद्यापीठ

१,नाथीबाई ठाकरसी रोड,न्यु मरीन लाईन्स,मुंबई-४०००२०.
दुरध्वनी क्रमांक:-२६६०४७०६/२२०३१८७९

**श्रीमती ना.दा.ठा.महिला विद्यापीठ अंतर्गत सुरक्षा पर्यवेक्षक व सुरक्षा रक्षक या संवर्गातील पदे बाहययंत्रणेव्दारे उपलब्ध करुन घेण्यासाठी ई-निविदा**

उपरोक्त संदर्भान्वये सुरक्षा पर्यवेक्षक /सुरक्षा रक्षक या संवर्गातील पदे बाह्यस्त्रोताव्दारे उपलब्ध करून घेण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. श्री.ना.दा.ठा.महिला विद्यापीठ विभागासाठी बाह्य यंत्रणेची निवड करण्याची जबाबदारी मा.कुलसचिव यांच्या अध्यक्षते खालील समितीवर सोपविण्यात आलेली आहे.त्याचप्रमाणे या विभागात सुरक्षा पर्यवेक्षक संवर्गातील ०६ व सुरक्षा रक्षक या संवर्गातील ५८ पदे अनुज्ञेय केलेली आहे.

सदर ई-निविदा सुचना,परिशिष्टे इत्यादी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १६/१२/२०२१ रोजी सकाळी ११ वाजेपासून ते २४/१२/२०२१ रोजी सायं ५ वाजेपर्यंत उपलब्ध आहेत.

## १.निविदेचा तपशील:-

| | |
|---|---|
| निविदा संदर्भ | SC/2021-2022/TSG-1/02 |
| कामाचे अंदाजित वार्षिक खर्च | रूपये- |
| निविदा रक्कम | रूपये- १५०००/- Online पध्दतीने |
| बयाना (EMD) रक्कम /इसारा रक्कम | रूपये- १५००००/- Online पध्दतीने |
| निविदा प्रसिध्द करणे | दिनांक १६/१२/२०२१ रोजी सकाळी ११ वा. |
| निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक १६/१२/२०२१ रोजी सकाळी ११ वा. ते दिनांक २४/१२/२०२१ रोजी सायं ५ वाजेपर्यंत. |

| | |
|---|---|
| संपर्क अधिकारी | मा.कुलसचिव यांचे कार्यालय,१,नाथीबाई ठाकरसी रोड,न्यु मरीन लाईन्स,मुंबई-४०००२०. |
| निविदा अर्जाच्या किंमतीचा ऑनलाईन पध्दतीने भरलेली पावती,बयाना रक्कम /इसारा रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरलेली पावती व निविदेसंबधी आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करणेचा कालावधी. | निविदा उपलब्ध कालावधीप्रमाणे (दि. १६/१२/२०२१ ते दि.२४/१२/२०२१) |
| निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २४/१२/२०२१ रोजी सायं ५ वाजेपर्यंत. |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक २७/१२/२०२१ रोजी सकाळी ११ वा. |
| निविदा प्री-बिड मिटींग(कोरोनाच्या पार्श्वभुमीवर प्रत्यक्ष प्रीबीड मिटींग घेणे शक्य नसल्यामुळे निविदेबाबत आपल्या काही शंका असल्यास दि. २१/१२/२०२१ सायंकाळी ०६ वा.पर्यंत drspecialcell@sndt.ac.in या मेलवर संपर्क करावा या तारखेनंतर कोणतीही शंका अथवा तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.) | दिनांक २१ /१२ /२०२१ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत ईमेल वर. |
| निविदा वैधता कालावधी | १२० दिवस |
| निविदा उघडण्याचे ठिकाण | मा.कुलसचिव यांचे कार्यालय,१,नाथीबाई ठाकरसी रोड,न्यु मरीन लाईन्स,मुंबई-४०००२०. |

**२.सुरक्षा पर्यवेक्षक /सुरक्षा रक्षक या संवर्गातील पदे बाह्यस्त्रोताव्दारे पुरवठा करणे व आवश्यक असलेली कागदपत्रांविषयी माहिती व सुचना –**

सध्या तीनही पाळयांमध्ये आवश्यक असणा-या सुरक्षा पर्यवेक्षक आणि सुरक्षा रक्षक यांची कॅम्पस निहाय एकूण संख्या खालीलप्रमाणे:

| आवार | सुरक्षा पर्यवेक्षक पुरूष | सुरक्षा रक्षक | |
|---|---|---|---|
| | | पुरूष | महिला |
| चर्चगेट | - | ०८ | ०३ |
| कन्याशाळा,गिरगांव | - | ०३ | |
| जुहू आवार | ०३ | १४ | ०३ |
| पुणे आवार | ०३ | २१ | ०३ |
| अहमदाबाद | - | ०३ | - |
| एकूण | ०६ | ४९ | ०९ |

एकूण ०६ सुरक्षा पर्यवेक्षक व ५८ सुरक्षा रक्षक अशा ६४ सुरक्षा मनुष्यबळाची आवश्यकता आहे.

**सुरक्षा रक्षक /सुरक्षा पर्यवेक्षक या संवर्गातील पदे यांचे कर्तव्य व जबाबदा-या.**

**सुरक्षा पर्यवेक्षक यांची कर्तव्ये:-**

१. कर्तव्यावर असताना गणवेशात सर्तक राहणे.
२. सुरक्षा रक्षकांच्या डयुटी पोस्ट चे वाटप करणे, दररोज सुरक्षा रक्षकांना बदलत्या पोस्टवर नेमावे.
३. विद्यापीठात येणा-या अभ्यागतांची नोंद रजिस्टरवर होते अथवा नाही याची खात्री करणे.
४. मेनगेटवर आणि विद्यापीठातील विविध ठिकाणी नेमलेल्या सुरक्षा रक्षकांच्या कामावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवावे.
५. पाळीमध्ये दर तासाला संपूर्ण विद्यापीठ आवाराची गह घेणे आणि विद्यापीठात विविध ठिकाणी नेमलेल्या सुरक्षा रक्षकांवर नियंत्रण ठेवणे.
६. विद्यापीठात येणा-या व जाणा-या सामानाची गेटपास प्रमाणे तपासणी होते किंवा नाही याची खात्री करणे.
७. विद्यापीठातील विविध विभागांकडून अथवा कर्मचा-यांकडून सुरक्षा समस्येबाबत फोनवर माहिती मिळाल्यास त्वरीत ती विद्यापीठाच्या सुरक्षा अधिकारी अथवा सुरक्षा पर्यवेक्षकांना देणे.
८. कामाव्यतिरिक्त मेन गेटवर कोणालाही थांबू न देणे तसेच कोणाबरोबर गप्पा मारू नये.
९. आपात्कालीन परिस्थीतीत विद्यापीठाच्या सुरक्षा अधिकारी/सुरक्षा पर्यवेक्षक यांच्या आदेशानुसार मेनगेट येथे हजर राहून तेथील परिस्थीती हाताळणे.

१०. विविध सुरक्षा पोस्टवर नेमलेल्या सुरक्षा रक्षकांना त्यांच्या कर्तव्याबाबत आवश्यक असेल तेथे लेखी/तोंडी सुचना देणे, आणि त्या सुचनांचे पालन होते किंवा नाही याची खातरजमा करणे.

११. कर्तव्यावर आलेल्या सुरक्षा रक्षकांचे गणवेश इतर टर्नआउटबाबत पाळी वाटप करताना पाहणी करणे व सुरक्षा रक्षकांना कामाबाबत आवश्यक असणा-या सूचना देणे.

१२. सुरक्षा रक्षकांच्या रजेचे नियंत्रण करणे तसेच डयुटीवाटप करताना कोणताही भेदभाव न करता सुरक्षा रक्षकांना डयुटी देणे.

१३. रजेवर जाणा-या सुरक्षा रक्षकांना विद्यापीठाच्या सुरक्षा अधिकारी/सुरक्षा पर्यवेक्षक रजेवर जाण्यास परवाणगी देणे आणि त्या कालावधीत पर्यायी सुरक्षा रक्षक नेमणे.

१४. विद्यापीठाचे सुरक्षा अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन करणे. इ.

**<u>सुरक्षा रक्षक यांची कर्तव्ये:-</u>**

१. कर्तव्यावर असताना गणवेशात सतर्क राहणे.

२. प्रवेशव्दार आवश्यकतेनुसार बंद ठेवणे अथवा उघडणे.

३. अभ्यांगन,अधिकारी,कर्मचारी,कंत्राटी कर्मचारी यांच्याशी सौजन्यने वागणे.

४. विद्यापीठात प्रवेश करणा-या अभ्यागतांची योग्य ती तपासणी करणे आणि रजिस्टरमध्ये नोंद घेऊनच आत सोडणे.

५. विद्यापीठाच्या आत येणा-या सामानाची तपासणी करून संबंधीत रजिस्टरमध्ये नोंद घेणे.

६. विद्यापीठ प्रवेशव्दाराजवळ कोणत्याही व्यक्ती बसू अथवा थांबू न देणे. मोकाट जनावरांना प्रवेश न देणे.

७. विद्यापीठाच्या सुरक्षा अधिकारी,सुरक्षा पर्यवेक्षक,कंत्राटी सुरक्षा पर्यवेक्षक यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन करणे.

८. कर्तव्य बजावत असताना येणा-या अडचणी व आढळणा-या त्रुटी सुरक्षा अधकारी अथवा सुरक्षा पर्यवेक्षक यांच्या नजरेस आणून देणे. व कार्यप्रणालीत अधिकाधिक सुधारणा करण्यास मदत करणे.

९. कोणतेही सामान,सामानाचे भरलेले वाहन,लोडींग करीता येणारी रिकामी वाहने यांना सुरक्षा अधिकारी/ सुरक्षा पर्यवेक्षक यांच्या परवानगीनेच प्रवेश देणे.

१०.शिष्टाचाराचे तंतोतंत पालन करणे / सकारात्मक धोरण अंगीकारणे.

११. प्रवेशव्दारामधून जाणा-या व येणा-या सामानाची व वाहनाची गेटपास नुसार तपासणी करून संबंधीत रजिस्टरमध्ये नोंद घेऊन सामान बाहेर सोडणे.

१२.योग्यरीत्या चार्ज दिल्या/घेतल्याशिवाय कर्तव्यस्थान सोडू नये.

१३.संशयीत वस्तू अथवा व्यक्ती आढळून आल्यास सुरक्षा पर्यवेक्षकांशी त्वरीत संपर्क साधणे.

१४.विद्यापीठाच्या निरनिराळया धोरणांची / योजनांची अंमलबजावणी करणे. इ.

## पाहिजेत

## बाहय यंत्रणेव्दारे सुरक्षा पर्यवेक्षक आणि सुरक्षा रक्षक या संवर्गातील पदे उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक असलेली कागदपत्रे.

निविदेत नमूद केल्याप्रमाणे , श्रीमती ना.दा.ठा.महिला विद्यापीठ अंतर्गत सुरक्षा पर्यवेक्षक व सुरक्षा रक्षक या संवर्गातील पदे बाहययंत्रणेव्दारे श्रीमती ना.दा.ठा.महिला विद्यापीठ,मुंबई विभागासाठी उपलब्ध करुन द्यावयाची आहेत. यासाठी कामाचा पुरेसा अनुभव असलेल्या मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहय यंत्रणांकडुन ई-निविदा प्रणालीव्दारे एक लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. या कामासाठी खाली नमुद केलेल्या अटी व शर्ती लागू राहतील.

१. ई-निविदा फि रूपये १५०००/- व इसारा रक्कम रूपये १,५०,०००/- Online पध्दतीने SBI NET BANKING किंवा NEFT व्दारे भरणा करावा. (इसारा रक्कम /बयाना रक्कम(EMD) भरणे अनिवार्य आहे यामध्ये कुठल्याही प्रकारची सुट दिली जाणार नाही. बयाना रक्कम(EMD)/इसारा रक्कम भरलेली नसल्यास निविदेचा विचार करता येणार नाही.)
२. निविदा स्विकृतीचा कालावधी दिनांक १६/१२/२०२१ रोजी सकाळी ११ वाजेपासून ते दिनांक २४/१२/२०२१ रोजी सायं ५ वाजेपर्यंत असून सदर निविदा दिनांक २७/१२/२०२१ रोजी सकाळी ११ वाजता मा.कुलसचिव यांचे समक्ष उघडण्यात येतील.
३. सदर ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
४. ई-निविदेत खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रति Upload करणे अनिवार्य आहे तसेच या सर्व बाबींची पुर्तता असणारे निविदाधारकच गुणांकणासाठी पात्र ठरतील.

   अ) निविदाधारक हा कंपनी अधिनियम १९५६ अंतर्गत नोंदणकृत असणे अनिवार्य आहे. सोबत नोंदणी प्रमाणपत्र,कंपनीची नियमावली व मसुदा जोडावे. निविदाधारक हा महाराष्ट्र शासनाच्या Private Security Regulation Act (PSARA) च्या अनुषंगाने अधिकृत परवानाधारक असणे अनिवार्य आहे.

   ब) पॅन कार्ड अनिवार्य.

   क) वस्तू व सेवाकर नोंदणी वैध प्रमाणपत्र अनिवार्य

   ड) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन कार्यालय (EPFO) यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र (मागील २ वर्षांचे ESR Statement व ESR Payment Reciept जोडणे आवश्यक)

   इ)राज्य कर्मचारी विमा कार्यालय (ESIC) यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य.

   फ)कामगार कल्याण निधी कार्यालय यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य (माहे जून २०२० चे किमान १०० पेक्षा अधिक सुरक्षा मनुष्यबळाचे चलन भरलेची पावती अनिवार्य)

ग) कामगार उपायुक्त कार्यालय यांचेकडील किमान १०० पेक्षा अधिक सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा केल्याचे Contract Labour Act १९७० अंतर्गत Labour Licence अनिवार्य.

ह)व्यवसायकार नोंदणी प्रमाणपत्र मागील तीन वर्षाचे २०१७-२०१८,२०१८-२०१९, २०१९-२०२० चे ना-देय (No Dues)प्रमाणपत्र अनिवार्य.

ज)आर्थिक वर्ष २०१७-२०१८, आर्थिक वर्ष २०१८-२०१९ व आर्थिक वर्ष २०१९-२०२० चे आयकर विवरणपत्र अनिवार्य.

म)निविदा धारकाची मागील ३ वर्षांमध्ये(आर्थिक वर्ष २०१७-२०१८,२०१८-२०१९, २०१९-२०२०)सरासरी किमान २ कोटी रूपये वार्षिक उलाढाल अनिवार्य.सनदी लेखापाल यांचे टर्नओव्हर सर्टीफिकेट (UDIN क्रमांकासहीत) जोडणे अनिवार्य.

न) आर्थिक वर्ष २०१७-२०१८, आर्थिक वर्ष २०१८-२०१९ व आर्थिक वर्ष २०१९-२०२० चे सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले संपुर्ण लेखापरिक्षण विवरणपत्र अनिवार्य.

प) निविदाधारकाने एक किंवा अधिक शासकीय कार्यालयामध्ये किमान १०० पेक्षा अधिक सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा केल्याचे प्रधिकृत अधिका-याचे अनुभव प्रमाणपत्र अनिवार्य. या पुरवठा केलेल्या सुरक्षा मनुष्यबळाचे मागील ६ महिण्यांचे EPF भरत असल्याचे ECR STATEMENT व PAYMENT RECIEPT जोडणे अनिवार्य.

य)निविदा धारकाला शासकीय/निमशासकीय/केंद्र शासकीय कार्यालयांना सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा करण्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

ल)निविदा धारकाने सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा करण्याचे एकाच निविदेव्दारे किमान रूपये १ कोटी इतक्या रकमेचे काम पूर्ण केलेले सक्षम अधिका-याचे स्वाक्षरीत प्रमाणपत्र अनिवार्य.

र)शासकिय/निमशासकीय/केंद्र शासकीय कार्यालयामध्ये काळया यादीत नाव समाविष्ट नसलेबाबतचे प्रमाणपत्र (Affidavit करून)रू.१०० च्या बॉन्डपेपरवर.

व)निविदाधारकाकडे ISO 9001(Quality Management System) आणि ISO (Occupational Health & Saftey Management System) प्रमाणपत्र असणे अनिवार्य.

श)निविदाधारकाने किमान रू.२ कोटी चे राष्ट्रीयकृत बॅंकेचे Solvency Certificate जोडणे अनिवार्य.

ष)निविदा धारकाशी संपर्क करण्यासाठी निविदा धारकाचे संपर्क कार्यालय मुंबई,ठाणे,नवी मुंबई या ठिकाणी असावे. संबंधित पुरावा जोडण्यात यावा.

स)निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र अनिवार्य.

ह)निविदा रक्कम रूपये १५०००/- ऑनलाईन पध्दतीने भरलेची पावती जोडणे अनिवार्य.

ळ)निविदाधारकावर दखलपात्र गुन्हा नोंद नसल्याचे पोलीस खात्याचे वैध प्रमाणपत्र अनिवार्य.

ज्ञ)निविदाधारक माजी सैनीक असल्यास आणि त्यांची संस्था वरील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास सदरील संस्थेला प्राधान्य देण्याचा अधिकार देण्यात येईल.

५. निविदाधारकास महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार सुरक्षा पर्यवेक्षक आणि सुरक्षा रक्षक यांना वेतन देणे बंधनकारक राहील. यांची अंमलबजावणी निविदाधारक संस्थेने न केल्यास त्याची सेवा ताबडतोब संपुष्टात आणण्यात येईल.सदर वेतन देयकाचा सुरक्षा कर्मचा-यांना दिला जाणारा मासिक वेतनासहित इतर तपशील विद्यापीठाला देणे बंधनकारक राहील.

६. ज्या बाहय यंत्रणा संस्थेला काम मंजूर करण्यात येईल तिला कामाचा आदेश देणेपूर्वी त्यांचेकडुन रक्कम रुपये ५००/- च्या बॉन्ड पेपरवर विद्यापीठाने निविदेमध्ये निश्चित केलेल्या अटी व शर्तीसह करारनामा करून घेण्यात येईल.

७. करारनाम्याचा कालावधी मार्च २०२२ किंवा संस्थेचे काम समाधानकारक राहील्यास पुढील तीन वर्षापर्यंत मुदतवाढ करण्यात येईल.अन्यथा संस्थेची सेवा समाप्त करण्यात येईल.

८. निविदा मंजूर करणे अगर नाकारणे आणि आवश्यक वाटल्यास विभागून देणे हे अधिकार मा. कुलसचिव यांनी राखून ठेवले आहेत.

९. निविदेतील कोणताही भाग अथवा सर्वच निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा किंवा स्विकारण्याचा हक्क मा. कुलसचिव यांनी राखून ठेवला आहे.

१०. एकापेक्षा जास्त निविदाधारकांचे गुण एकसमान आल्यास अंतिम निविदाधारक निवडण्याचा सर्वाधिकार निवड समितीला राहील.

**सर्व साधारण सुचना:-**

- सुरक्षा अनामत सुरक्षा अनामत (Security Depost)/ Performance Bank Guarantee ज्या निविदा धारकांची निविदा स्विकृत केली जाईल त्या निविदा धारकाने ३ टक्के म्हणजेच अंदाजे ३,००,०००/- इतकी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम Demand Draft किंवा Bank Gurantee स्वरूपात भरणे आवश्यक राहील.
- बाह्य यंत्रणेकडुन पुरविण्यात येणा-या तांत्रिक मनुष्यबळाची पात्रता:-

**१.सुरक्षा रक्षक**

अ) वय:-किमान २१ वर्ष व कमाल ५८ वर्षापेक्षा जास्त असू नये.
ब) शैक्षणिक पात्रता: १०वी/SSC पास
क) अनुभव: किमान २ वर्षे
ड) एकत्रित मानधन रूपये /- प्रती माह

**२.सुरक्षा पर्यवेक्षक**

अ) वय:-किमान ३० वर्ष व कमाल ५८ वर्षापेक्षा जास्त असू नये.
ब) शैक्षणिक पात्रता: १२वी/HSC पास
क) अनुभव: किमान ५ वर्षे
ड) एकत्रित मानधन रूपये /- प्रती माह

➢ **<u>देयमानधन:-</u>**

बाह्ययंत्रणेने वरील पात्रताप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करून दयावयाचे आहे. निविदेमध्ये नमुद केलेल्या मागणीनुसार विभागास अनुज्ञेय असलेल्या मनुष्यबळाची संख्या लक्षात घेता मनुष्यबळ उपलब्ध करून दयावे लागेल. उपलब्ध करून देण्यात आलेल्या मनुष्यबळास बाह्य यंत्रणेने महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक आहे. कंपनीस असे मनुष्यबळ पुरविल्याबद्दल १० टक्के सर्विस चार्ज देण्यात येईल. याशिवाय शासकीय देय कर(GST) देखील अदा करण्यात येतील.

उपलब्ध करून देण्यात आलेल्या मनुष्यबळास कामाच्या अनुषंगाने जिल्ह्याबाहेर इतर कामांसाठी प्रवास करावा लागल्यास यासाठी त्यांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता पदास देय असणा-या तरतूदीप्रमाणे देण्यात येतील.

विद्यापीठाने मनुष्यबळास दिलेल्या मानधनाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारच्या कमी अदायगी/ चुकीचे अदायगी बाबत जबाबदार राहणान नाही. मनुष्यबळ यांच्या सेवा पुरविताना कामगार कायद्यातील अनुषंगिक सर्व बाबींची पूर्तता करावयाची असून त्या अनुषंगाने सर्व प्रकारच्या दायित्वाची जबाबदारी बाह्य यंत्रणेची राहील. दरमहा झालेल्या कामाच्या अनुषंगाने देयकाची मागणी संबंधित अधिकारी यांच्याकडे पाच तारखेच्या आत विहित नमुन्यात कंपनीने करावी. कंपनीच्या या मागणीच्या अनुषंगाने दहा तारखेपर्यंत संबंधित अधिकारी हे पडताळणी करून मानधन अदा करतील.वरील प्रमाणे कंपनीकडून प्राप्त मागणीबाबत संबंधित अधिकारी हे खात्री पटवून प्रमाणित करून घेतील व देयक अदायगीची कार्यवाही करतील. असे देयक अदा करतांना तांत्रिक मनुष्यबळ निहाय मानधनाची रक्कम व त्या अनुषंगाने मानधनाच्या रकमेवर मानधन देय बिलामध्ये अतिरिक्त १० % कंपनीचा सर्विस चार्ज व १८ % वस्तू व सेवा कर अंतर्भूत करून देण्यात येईल.कंपनीस मानधन रक्कम अदायग करतांना धनादेश /धनाकर्ष/आरटीजीएस यासारख्या पारदर्शक पध्दतीने कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे कंपनीने मनुष्यबळास देखील याच पारदर्शक पध्दतीने मानधन रक्कम वितरित करावी. असे करताना कंपनीने त्यांचा मासिक व्यवसाय कर हा मनुष्यबळाच्या देय मानधनातून नियमाप्रमाणे कपात करून शासनखाती जमा करावे.

संस्थेने वस्तू व सेवा कर क्रमांक तसेच पॅन कार्ड क्रमांक इ. विद्यापीठाच्या संबंधित अधिकारी व कार्यालयास उपलब्ध करून दयावा जेणेकरून कराची कपात करणे व इतर अनुषंगिक बाबी सुकर होतील.

➢ **<u>व्यवस्थेचा कालावधी</u>**

बाह्ययंत्रणेची निवड ही मार्च २०२२ पर्यंत राहील. बाह्ययंत्रणेचे काम समानधानकारक असल्यास याबाबतचा आढावा घेऊन सदरच्या कार्यक्रमास मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. बाह्ययंत्रणेचे काम समाधानकारक नसल्यास त्यांचे काम संुष्टात आणण्याचे सर्व अधिकार मा.कुलसचिवयांनी राखून ठेवलेले आहेत. सदरील आदेश मार्च २०२२ किंवा या कार्यालयाच्या निर्देशानुसार यापैकी जे अगोदर घडेल तेव्हा आपोआप संपुष्टात येतील.

बाह्य यंत्रणेस पुरवठा / सेवा संपुष्टात आणावयाची असल्यास किमान एक महिना अगोदर मा.कुलसचिव यांना लेखी स्वरूपात कळविण्यात यावे. अशावेळी गुणानुक्रमे पुढील क्रमाने पात्र संस्थेची निवड मा.कुलसचिव हे करतील पुन्हा निविदा मागविण्याची आवश्यकता राहणार नाही.

- मनुष्यबळास मा.कुलसचिव/सुरक्षा अधिकारी अंतर्गत नियुक्त केलेल्या ठिकाणी येथे काम करावे लागेल. मनुष्यबळ यांना मानधन रक्कम अथवा कोणताही निधी थेट दिला जाणार नाही. कोणत्याही स्वरूपाचा पत्रव्यवहार हा थेट कंपनीशी करण्यात येईल. कंपनीने दरमहा देयकाची मागणी संबंधित अधिकारी यांच्याकडे करावी. संबंधित अधिकारी हे देयकाबाबत खात्री पटवून पाक्षिकाच्या आत देयकाची अदायगी कंपनीस करतील.
- कोणत्याही प्रकारच्या विवादास्पद बाबींसाठी मा.कुलसचिव/सुरक्षा अधिकारी यांच्याकडे दाद मागता येईल. मा.कुलसचिव यांचा निर्णय अंतिम राहील.

## ३. मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहय यंत्रणांची निवड:-

मनुष्यबळ पूरवठा करणा-या बाहय यंत्रणेस (कंपनी) यांना शाकीय कार्यालयास किमान ५ वर्षाचा मनुष्यबळ पुरवठा करण्याचा अनुभव असला पाहिजे ज्यामध्ये सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा रक्षक यास मनुष्यबळ समजण्यात येईल.निविदामध्ये नमुद केलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रति Upload करणे अनिवार्य आहे .तसेच या सर्व बाबींची पुर्तता असणारे निविदाधारकच गुणांकणासाठी पात्र ठरतील.
याप्रमाणे संस्था निवडताना खालील तांत्रिक निकष विचारात घेतले जातील.

| | |
|---|---|
| १. | तांत्रिक मनुष्यबळ पुरवठा |
| २. | मगील तीन वर्षाचे लेखा परिक्षित ताळेबंद |
| ३. | बाहय यंत्रणेची वित्तिय क्षमता |

**बाहय यंत्रणांची निवड करताना विचारात घ्यावयाचे गुणांकन**

| अ. क्र. | विवरण | गुणसंख्या | अभिप्राय /विश्लेषण |
|---|---|---|---|
| १. | मनुष्यबळ पुरवठा | ५० गुण | मनुष्यबळ एकूण गुण ५०. |
| २. | मगील तीन वर्षाचे लेखा परिक्षित ताळेबंद | २० गुण | मगील तीन वर्षामध्ये यंत्रणेने सरासरी किती आर्थिक लेखापरीक्षण केलेले आहे त्याप्रमाणे प्रत्येक वर्षासाठी ५ गुण |
| ३. | बाहय यंत्रणेची वित्तिय क्षमता | २० गुण | मगील तीन वर्षातील किमान वार्षिक उलाढाल |
| ४. | शैक्षणिक संस्था या ठिकाणी अनुभव असल्यास | १० गुण | महाविद्यालय/शाळा/शैक्षणिक संस्थात्मक सेवा अनुभव |

**१)-मनुष्यबळ पुरवठा ५० गुणसंख्येचे विश्लेषण**

अ. मनुष्यबळ पुरवठा **१० गुण**

| **अ.क्र.** | **मागील पाच वर्षात सरासरी मनुष्यबळ पुरवठा संख्या** | **गुण** |
|---|---|---|
| १. | ५१ ते १०० पर्यंत | २ गुण |
| २. | १०० ते २०० पर्यंत (पुढील प्रत्येकी ३ संख्येस प्रत्येकी १ गुण याप्रमाणे कमाल १० गुण) | ४ गुण |
| ३. | २०० ते ३०० पर्यंत | ५ गुण |
| ४. | ३०० पेक्षा जास्त | १० गुण |

ब.मनुष्यबळ पुरवठा कालावधी **गुण २०**

| **अ.क्र.** | **मागील तीन वर्षात एकाच शासकीय कार्यालयास मनुष्यबळ पुरवठा संख्या** | **गुण** |
|---|---|---|
| १. | २६ ते ५० पर्यंत | १० गुण |
| २. | ५० पेक्षा जास्त (पुढील प्रत्येकी ३ संख्येस प्रत्येकी १ गुण याप्रमाणे कमाल २० गुण) | २५ गुण |

क. विविध जिल्हयांमध्ये मनुष्यबळ पुरवठा **गुण ३०**

| **अ.क्र.** | **मागील पाच वर्षात महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील शासकीय कार्यालयास मनुष्यबळ पुरवठा जिल्हे संख्या** | **गुण** |
|---|---|---|
| १. | १ ते ५ जिल्हयांमध्ये | ५ गुण |
| २. | ६ ते १० जिल्हयांमध्ये | १० गुण |
| ३. | ११ ते २५ जिल्हयांमध्ये | १५ गुण |
| ४. | १६ ते २० जिल्हयांमध्ये | २० गुण |
| ५. | २१ ते २५ जिल्हयांमध्ये | २५ गुण |
| ६. | २ ५ जिल्हयांपेक्षा जास्त | ३० गुण |

**२)- मागील तीन वर्षाचे लेखा परिक्षित ताळेबंद २० गुणसंख्येचे विश्लेषण**

| **अ. क्र.** | **मागील तीन वर्षांमध्ये यंत्रणेने सरासरी किती आर्थिक लेखापरीक्षण केलेले आहे.** | **गुण** |
|---|---|---|
| १. | १ वर्षाचे लेखापरिक्षण | ५ गुण |
| २. | २ वर्षाचे लेखापरिक्षण | १० गुण |
| ३. | ३ वर्षाचे लेखापरिक्षण | २० गुण |

**३)- बाहय यंत्रणेची वित्तिय क्षमता २० गुणसंख्येचे विश्लेषण**

| **अ.क्र.** | **मगील तीन वर्षातील किमान वार्षिक उलाढाल** | **गुण** |
|---|---|---|
| १. | १ कोटी पर्यंत | ५ गुण |
| २. | १.१ कोटी ते ३ कोटी | १० गुण |
| ३. | ३.१ कोटी ते ५ कोटी | १५ गुण |
| ४. | ५ कोटी पेक्षा जास्त | २० गुण |

**४. <u>निविदा लिफाफा अर्ज</u>**

निविदाकारांनी सदर अटी व शर्ती मान्य असल्याचे नमूद करून सही व शिक्का निशी सादर करणे.

प्रति,

विषय: सुरक्षा पर्यवेक्षक आणि सुरक्षा रक्षक इ.मनुष्यबळ पुरविण्याची निविदा.
दिनांक आपले कार्यालयाच्या जाहिरातीनुसार.........................................
कार्यालयात मनुष्यबळ पुरविण्याची निविदा भरत आहोत.

| अ.क्र. | तपशील | आहे/नाही |
|---|---|---|
| १ | ई-निविदा खरेदी फी रुपये १५०००/- अनिवार्य | |
| २ | इसारा रक्कम रुपये १,५०,०००/- अनिवार्य | |
| ३ | निविदाधारक हा कंपनी अधिनियम १९५६ अंतर्गत नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे. सोबत नोंदणी प्रमाणपत्र, कंपनीची नियमावली व मसुदा जोडावे. निविदाधारक हा महाराष्ट्र शासनाच्या Private Security Regulation Act (PSARA) च्या अनुषंगाने अधिकृत परवानाधारक असणे अनिवार्य आहे. | |
| ४ | पॅन कार्ड क्रमांक अनिवार्य | |
| ५ | वस्तू व सेवाकर नोंदणी वैध प्रमाणपत्र अनिवार्य तसेच मागील तीन वर्षाचे २०१७-२०१८,२०१८-२०१९ व २०१९-२०२० चे ना-देय (No Dues) प्रमाणपत्र अनिवार्य. | |
| ६ | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन कार्यालय (EPFO)यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र किमान २ वर्षाचे किमान १०० पेक्षा अधिक सुरक्षा मनुष्यबळाचे (ECR Statement व ECR Payment Receipt जोडणे आवश्यक.) | |
| ७ | राज्य कर्मचारी विमा कार्यालय (ESIC)यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य. | |
| ८ | कामगार कल्याण निधी कार्यालय यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे (माहे जून २०२१ चे किमान १०० पेक्षा अधिक सुरक्षा मनुष्यबळांचे चलन भरलेची पावती अनिवार्य.) | |
| ९ | कामगार उपायुक्त कार्यालय यांचेकडील किमान १०० पेक्षा अधिक सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा केल्याचे Contract Labour Act १९७० अंतर्गत Labour Licence अनिवार्य. | |

| | | |
|---|---|---|
| १० | व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र ( मागील तीन वर्षाचे २०१७-२०१८,२०१८-२०१९ व २०१९-२०२० चे ना-देय (No Dues) प्रमाणपत्र अनिवार्य.) | |
| ११ | आर्थिक वर्ष २०१७-२०१८, आर्थिक वर्ष २०१८-२०१९ व आर्थिक वर्ष २०१९-२०२० चे आयकर विवरणपत्र अनिवार्य आणि सदरील वर्षाचे आयकर २६ AS चलान अनिवार्य. | |
| १२ | निविदा धारकाची मागील ३ वर्षांमध्ये आर्थिक वर्ष (२०१७-२०१८, २०१८-२०१९ व २०१९-२०२०) सरासरी किमान २ कोटी रूपये वार्षिक उलाढाल अनिवार्य.सनदी लेखापाल यांचे टर्नओव्हर(UDIN क्रमांकासहीत) सर्टीफिकेट जोडणे अनिवार्य. | |
| १३ | आर्थिक वर्ष २०१७-२०१८, आर्थिक वर्ष २०१८-२०१९ व आर्थिक वर्ष २०१९-२०२० चे सनदी लेखापाल यांनी प्रमाणिक केलेले संपुर्ण लेखापरिक्षण विवरणपत्र अनिवार्य. | |
| १४ | निविदाधारकाने एकाच शासकीय कार्यालयामध्ये किमान १०० पेक्षा अधिक सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा केल्याचे प्राधिकृत अधिका-याचे अनुभव प्रमाणपत्र अनिवार्य.या पुरवठा केलेल्या मनुष्यबळाचे मागील ६ महिण्यांचे EPF भरत असल्याचे ECR STATEMENT व PAYMENT RECIEPT जोडणे अनिवार्य. | |
| १५ | निविदा धारकाला शासकीय/निमशासकीय/केंद्र शासकीय कार्यालयांना सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा करण्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव अनिवार्य. | |
| १६ | निविदा धारकाने सुरक्षा मनुष्यबळ पुरवठा करण्याचे एकाच निविदेव्दारे किमान रूपये १ कोटी इतक्या रकमेचे काम पुर्ण केलेले सक्षम अधिका-याचे स्वाक्षरीत प्रमाणपत्र अनिवार्य. | |
| १७ | शासकीय/निमशासकीय/केंद्र शासकीय कार्यालयामध्ये काळया यादीत नाव समाविष्ट नसलेबाबतचे प्रमाणपत्र (Affidavit करून) रू.१०० बॉन्डपेपरवर. | |
| १८ | निविदा धारकाकडे ISO 9001 (Quality Management System) आणि ISO (Occupational Health & Safety Manangement System) प्रमाणपत्र असणे अनिवार्य. | |
| १९ | निविदाधारकाने किमान रू.२ कोटी चे राष्ट्रीयकृत बॅंकेचे Solvency Certificate जोडणे अनिवार्य. | |
| २० | निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र अनिवार्य. | |
| २१ | निविदाधारकावर दखलपात्र गुन्हा नोंद नसल्याचे पोलीस खात्याचे वैध प्रमाणपत्र अनिवार्य. | |
| २२ | माजी सैनिक संस्था वरील अटी व शर्तीची पूर्तता करत असल्यास सदरील संस्थेला प्राधान्य देण्यात येईल. | |
| २३ | निविदा धारकाशी संपर्क करण्यासाठी निविदा धारकाचे संपर्क कार्यालय,मुंबई,ठाणे,नवी मुंबई या ठिकाणी असावे. संबंधित पुरावा अपलोड करण्यात यावा. | |